| | |
|---|---|
| MHNS190018782022 | फौजदारी चौकशी अर्ज क्र. ४०३/२०२२.<br>रोहिनी प्रशांत जाधव.<br>विरुध्द<br>प्रशांत बाजीराव जाधव. |

निशाणी ५ वरील आदेश
दिनांक १२.०६.२०२३.

१. अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज अंतरिम पोटगी मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२. अर्जदाराने तिच्या अर्जात असे कथन केले आहे की, दिनांक ०८.०८.२०२२ रोजी तिचे व गैरअर्जदाराचे लग्न झाले. सदर लग्नास अर्जदार व गैरअर्जदार यांच्या घरातील कोणीही व्यक्ती हजर नव्हत्या. गैरअर्जदाराने अर्जदाराची फसवणुक करण्याच्या हेतुने सदरचे लग्न केले. गैरअर्जदाराचे अर्जदारावर एकतर्फी प्रेम होते व नंतर त्यांचे लग्न झाले. त्यांच्यातील नाते अद्याप कायम आहे. त्यांना कोणतेही अपत्य नाही. गैरअर्जदार हा अर्जदाराचा दुरचा नातेवाईक आहे. त्यामुळे घरगुती कार्यक्रमात सदर दोघांची नेहमी भेट होत होती. त्यातुन गैरअर्जदाराचे अर्जदारावर एकतर्फा प्रेम होते व आहे.

३. अर्जदार ही कॉलेजसाठी घराबाहेर पडली असता, गैरअर्जदार हा तिचा पाठलाग करत असे तसेच अश्लिल हावभाव करत असे. अर्जदाराने त्याच्याकडे दुर्लक्ष केले. परंतु, त्याचे त्रास देणे सुरुच होते. दिनांक ०८.११.२०२० रोजी अर्जदार ही तिच्या कामानिमीत्त घराबाहेर पडली असता, गैरअर्जदाराने तिला अडविले व मित्राच्या साहयाने तिला गाडीत टाकले. अर्जदाराने प्रतिकार करण्याच्या प्रयत्न केला परंतु गैरअर्जदाराने तिला ठार मारण्याची धमकी दिली. गैरअर्जदाराने तिला नाशिक येथे नेले व अर्जदाराच्या मनाविरुध्द तिच्याशी लग्न केले. सदर घटनेपासून अर्जदार ही तिच्या माहेरी राहत आहे. सदर घटनेनंतर गैरअर्जदाराने अर्जदाराला तिच्या घरी आणुन सोडले व घडलेला प्रकार कोणाला सांगु नको अशी दमदाटी केली.

४. काही दिवसानंतर अर्जदाराने घडलेली घटना तिच्या आईला सांगितली व तिच्या आईने घरातील सर्वांना सांगितली. त्यानंतर दिनांक १०.१०.२०२२ रोजी अर्जदाराचे वडील व मामा हे अर्जदारासह गैरअर्जदाराच्या घरी गेले असता, गैरअर्जदाराच्या आईवडीलांनी तिला घरात घेतले नाही. त्यामुळे ती परत माहेरी आली. त्यानंतर अर्जदाराने गैरअर्जदाराकडे नांदायला जाण्यासाठी बरेच प्रयत्न केले. परंतु गैरअर्जदाराने तिला नांदविण्यास नकार दिला. त्यानंतर दिनांक २१.१०.२०२२ रोजी अर्जदाराने

गैरअर्जदाराला वकीलामार्फत नोटीस पाठविली.

५. अर्जदार ही गैरअर्जदाराकडे नांदण्यास तयार आहे. अर्जदाराच्या आईवडीलांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाकीची आहे. ती स्वतःचा उदरनिर्वाह करण्यास असमर्थ आहे. याउलट, अर्जदार ही गैरअर्जदाराकडे नांदण्यास तयार आहे. याउलट, गैरअर्जदाराकडे मौजे कानळद, ता. निफाड येथे गट क्र. १० व ३७१ या बागायत शेजमिनी आहेत. त्यापासून त्याला खर्च वजा जाता १० लाख उत्पन्न मिळते. तसेच गैरअर्जदार हा वेल्डींगचे काम करतो. त्याचे वेल्डींगचे दुकान आहे त्यापासून त्याला एक लाख रुपये उत्पन्न मिळते. गैरअर्जदाराची आर्थिक परिस्थिती चांगली आहे. म्हणुन अर्जदाराने सदरचा अर्ज दाखल केला.

६. गैरअर्जदार याने नि.क्र.१२ वर स्वतःचे म्हणणे दाखल केले आहे व अर्जदाराच्या अर्जातील कथने नाकारली आहेत. त्याने त्याच्या अर्जात असे कथन केले की, अर्जदाराने खरी वस्तुस्थिती लपवुन अर्ज दाखल केला आहे. त्याने त्याच्या जबाबामध्ये असे कथन केले आहे की, दिनांक ०८.०८.२०२२ रोजी अर्जदार व गैरअर्जदार यांचे लग्न झाले व त्यांच्यातील संबंध आजही कायम आहेत. सदर दोघांचे लग्नाअगोदर प्रेमसंबंध होते. त्यास दोघांच्या आईवडीलांचा विरोध होता त्यामुळे त्यांनी दिनांक ०८.०८. २०२२ रोजी नाशिक येथील नवजिवन वैदिक विवाह संस्था येथे वैदिक पध्दतीने प्रेमविवाह केला. लग्नानंतर गैरअर्जदार हा अर्जदाराला घरी कानळद येथे घेवुन आला. दिनांक ०९.०८.२०२२ रोजी अर्जदाराचे आईवडील व मामा हे गैरअर्जदाराच्या घरी आले आणि तुम्हा दोघांचा स्वागत समारंभ करु असे सांगुन अर्जदाराला घरी घेवुन गेले .

७. त्यानंतर आठ दिवसांनी गैरअर्जदाराने अर्जदारास फोन केला त्यावेळी अर्जदाराने त्याला सांगितले की, तिचे आईवडील तिला पाठविण्यास तयार नाहीत. त्यानंतर अर्जदाराचे आईवडील व मामा यांनी अर्जदारासाठी दुस-या स्थळाचा शोध घेतला आणि अनकाई गोरखनगर येथील स्थळ पाहिले. त्याबाबतची अर्जदाराने गैरअर्जदाराला दिली आणि तिला घेवुन जाण्यास सांगितले. दिनांक १४.०९.२०२२ रोजी गैरअर्जदार व त्याचा मावसभाउ वाल्मीक शिंदे अर्जदाराच्या माहेरी आले. त्यावेळी अर्जदाराच्या मामांनी गैरअर्जदाराला शिवीगाळ केली. त्यांनी अर्जदाराला गैरअर्जदारासोबत पाठविले नाही.

८. दिनांक २३.०९.२०२२ रोजी अर्जदाराच्या मामांनी अर्जदारावर दबाव टाकुन नाशिक येथील क्रांती महिला संस्था यांच्याकडे अर्ज दिला. दिनांक ०९.१०.२०२२ रोजी गैरअर्जदार तेथे हजर झाला. त्यावेळी तेथे अर्जदाराने गैरअर्जदारासोबत नांदण्यास तयार असल्याचे सांगितले. परंतु, आईवडील व

मामा यांच्या दबावाखाली पहिल्यांदा नांदण्यास नकार दिला. त्यानंतर दिनांक १७.१०.२०२२ रोजी अर्जदाराने नातेवाईकांच्या सांगण्यावरुन येवला पोलीस ठाण्यात गैरअर्जदाराविरुध्द तक्रार दिली. त्यावेळी पोलीसांनी व गावातील प्रतिष्ठीत लोकांनी अर्जदाराने गैरअर्जदाराकडे नांदण्यासाठी जावे म्हणुन समजुत घातली परंतु अर्जदार तयार झाली नाही. त्यानंतरही गैरअर्जदाराने अर्जदाराला आणण्यासाठी बरेच प्रयत्न केले. परंतु आईवडील व मामांच्या दबावामुळे अर्जदार आली नाही.

९. गैरअर्जदाराची अर्जदाराबरोबर नांदण्याची इच्छा आहे. परंतु, अर्जदाराच्या मामाने दिलेल्या धमकीमुळे गैरअर्जदार घाबरला आहे. अर्जदाराने तिचे आईवडील व मामांच्या दबावापोटी गैरअर्जदाराचा त्याग केला आहे व दुसरे लग्न करण्याच्या विचारात आहे. गैरअर्जदाराने अर्जदार नांदण्यास येण्याकामी निफाडच्या कोर्टात केस दाखल केली आहे. गैरअर्जदारावर त्याच्या वडीलांना सांभाळण्याची जबाबदारी आहे. याउलट, अर्जदार हिने ब्युटीपार्लरचा कोर्स केला असुन ती येवला येथे ब्युटी पार्लरचा व्यवसाय करते व त्यापासून तिला दरमहा १५ ते २० हजार रुपये मिळतात. तिला पोटगीची आवश्यकता नाही. म्हणुन गैरअर्जदाराने अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

**१०.** नि.क्र.०८ वर अर्जदाराने स्वत:चे उत्पन्नाचे शपथपत्र दाखल केले आहे. तसेच नि.क्र.१५ वर गैरअर्जदाराने स्वत:चे उत्पन्नाचे शपथपत्र दाखल केले आहे.

**११.** अर्जदारांच्या अर्जातील कथने व गैरअर्जदाराच्या म्हणण्यातील कथने यावरुन पुढील मुद्दे माझ्या विचारात उपस्थित झाले. त्यांचे निष्कर्ष मी पुढे नमुद कारणमिमांसेसह देत आहे:-

| अ.क्र. | मुद्दे. | निष्कर्ष. |
|---|---|---|
| १. | गैरअर्जदाराकडुन दरमहा रुपये २०,०००/- अंतरिम पोटगी मिळण्यास अर्जदार ही पात्र आहे काय? | दरमहा रुपये १५००/-. |
| २. | आदेश काय? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा.

**१२.** अर्जदाराने तिच्या अर्जामध्ये असे कथन केले आहे की, गैरअर्जदाराबरोबर तिचे लग्न दिनांक ०८.०८.२०२२ रोजी झाले. अर्जदाराने तिच्या म्हणण्याच्या समर्थनार्थ कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही. गैरअर्जदाराने नि.क्र.१२ वर त्याचे म्हणणे दाखल केले आहे. त्याने त्याच्या म्हणण्याच्या परिच्छेद क्र.३ मध्ये त्याचे व अर्जदाराचे लग्न झाले असल्याचे व ते दोघे पती-पत्नी असल्याचे कबुल केले आहे.

**१३.** अर्जदाराने तिच्या अर्जामध्ये असे कथन केले आहे की, दिनांक १०.१०.२०२२ रोजी अर्जदार,

तिचे वडील व मामा यांच्यासह गैरअर्जदाराच्या घरी गेली असता, गैरअर्जदार व त्याच्या आईवडीलांनी तिला घरात घेतले नाही. त्यामुळे अर्जदार नाईलाजाने माहेरी परत आली. गैरअर्जदाराने त्याच्या म्हणण्यामध्ये त्याने अर्जदाराला घरात घेतले नसल्याचे कथन नाकारले आहे. गैरअर्जदाराने त्याच्या म्हणण्यामध्ये असे कथन केले आहे की, दिनांक ०९.१०.२०२२ रोजी क्रांती महिला संस्थेच्या समोर अर्जदार व गैरअर्जदार हजर झाले असता, अर्जदाराने तिचे मामा व आईवडीलांच्या दबावाखाली गैरअर्जदाराबरोबर नांदण्यासाठी येण्यास नकार दिला. त्यानंतर देखील दिनांक १७.१०.२०२२ रोजी येवला पोलीसांनी अर्जदार व गैरअर्जदार यांना व त्यांच्या नातेवाईकांना बोलावुन घेतले. त्यावेळी देखील अर्जदार ही गैरअर्जदाराबरोबर नांदण्यास तयार झाली नाही.

**१४.** गैरअर्जदाराने त्याच्या म्हणण्यामध्ये असे कथन केले आहे की, अर्जदाराने स्वतःहुन त्याचा त्याग केला आहे. यावरुन अर्जदार ही माहेरी राहत असल्याचे दिसुन येते. अर्जदाराने तिच्या अर्जामध्ये असे कथन केले आहे की, गैरअर्जदाराकडे मौजे कानळद तालुका निफाड येथील गट क्र.१० व ३७१ या शेतजमिनी आहेत. त्यापासून त्याला रुपये १० लाख उत्पन्न मिळते. तसेच तो वेल्डींगचे काम करतो व त्यापासून त्याला एक लाख रुपये उत्पन्न मिळते. याउलट, अर्जदार ही शिक्षण घेत आहे. अर्जदाराने तिच्या म्हणण्याच्या समर्थनार्थ मौजे कानळद येथील गट क्र.१० व गट क्रमांक ३७१ चा ७/१२ उतारा दाखल केला आहे. मी सदर उता-यांचे अवलोकन केले. गट क्र.१० च्या उता-यामध्ये सदरची जमिन भिमराज बाळकृष्ण जाधव व बाजीराव बाळकृष्ण जाधव यांच्या सामाईक मालकीची जमिन असल्याचे दिसुन येते. तसेच गट क्रमांक ३७१ च्या उता-याचे अवलोकन केले असता, भिमराज बाळकृष्ण जाधव व बाजीराव बाळकृष्ण जाधव हे दोघेही प्रत्येकी १.१६ एच.आर मिळकतीचे मालक असल्याचे दिसुन येते. सदर दोन्ही उता-यांवरुन गट क्र.१० व ३७१ पैकी कोणतीही जमिन गैरअर्जदाराच्या मालकीची असल्याचे दिसुन येत नाही.

**१५.** अर्जदाराने तिचे उत्पन्न दाखविणारा प्रतिज्ञालेख नि.क्र.०८ वर दाखल केला आहे. सदर प्रतिज्ञालेखामध्ये तिच्या नावाने कोणतीही मिळकत असल्याचे नमुद केलेले नाही. गैरअर्जदाराने त्याचे उत्पन्न दाखविणारा प्रतिज्ञालेख नि.क्र.१५ वर दाखल केला आहे. सदर प्रतिज्ञापत्रामध्ये त्याचे दरमहा उत्पन्न निरंक दाखविले आहे. तसेच मौजे कानळद येथील गट क्र.३७१ पैकी १.१६ एच.आर ही मिळकत त्याची वडीलोपार्जीत असल्याचे दाखविले आहे.

**१६.** अर्जदाराने तिच्या अर्जासोबत गट क्र.१० व ३७१ चे उतारे दाखल केले आहे. सदर उता-यावरुन गैरअर्जदार क्र.१० व ३७१ चा मालक असल्याचे दिसुन येत नाही. गैरअर्जदाराने त्याच्या उत्पन्नाच्या

शपथपत्रामध्ये मौजे कानळद येथील गट क्र.३७१ पैकी १.१६ एच.आर. एवढी मिळकत त्याची वडीलोपार्जीत असल्याचे नमुद केले आहे. परंतु, त्यापासून किती उत्पन्न मिळते याचा उल्लेख केलेला नाही. अर्जदाराने तिच्या अर्जामध्ये असे कथन केले आहे की, गैरअर्जदाराला सदर दोन शेतजमिनींमधुन १० लाख रुपये उत्पन्न मिळते. परंतु, तिच्या म्हणण्याच्या समर्थनार्थ कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. गैरअर्जदाराने त्याच्या म्हणण्यामध्ये असे कथन केले आहे की, अर्जदार हि ब्युटी पार्लरचा व्यवसाय करते व त्यापासून तिला १५ ते २० हजार उत्पन्न मिळते. परंतु, गैरअर्जदाराने त्याच्या म्हणण्याच्या समर्थनार्थ कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही.

**१७.** गैरअर्जदाराने त्याच्या म्हणण्यामध्ये अर्जदाराशी असलेले नाते नाकारलेले नाही. त्यामुळे अर्जदार पत्नीचा सांभाळ करण्याची प्राथमिक जबाबदारी गैरअर्जदाराची आहे. गैरअर्जदाराने अर्जदार ब्युटी पार्लरचा व्यवसाय करत असल्याबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. त्यामुळे अर्जदाराला उत्पन्नाचे साधन असल्याबाबतचा कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही. गैरअर्जदाराच्या म्हणण्यावरुन अर्जदार ही माहेरी राहत असल्याचे दिसुन येते. तसेच तिला तिच्या मुलभुत गरजा भागविण्यासाठी पैशांची आवश्यकता असल्याचे दिसुन येते. तिच्या मुलभुत गरजा भागविण्याची प्राथमिक जबाबदारी गैरअर्जदाराची आहे. त्यामुळे गैरअर्जदार कडुन अंतरिम पोटगी मिळणेस अर्जदार ही पात्र आहे. म्हणुन मी मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदवितो.

**<u>मुद्दा क्र.२ करीता</u>**:-

**१८.** मी मुद्दा क्र.१ करीता नोंदविलेले निष्कर्ष व दिलेले कारणमिमांसा याआधारे पुढील आदेश पारीत करतो:-

**<u>आदेश:</u>**-

**१.** नि.क्र.०५ वरील अर्ज मंजुर करण्यात येतो.

**२.** गैरअर्जदाराने अर्जदार यांना अर्ज दाखल तारखेपासून दरमहा रक्कम रुपये १५००/- अंतरिम पोटगी म्हणुन मुळ अर्जाचा अंतिम निर्णय होईपर्यंत द्यावेत.

आदेश खुल्या न्यायालयात टंकलिखीत व जाहिर करण्यात आला.

Digitally signed by LIGADE MILIND SIDRAM
Date: 2023.06.13 11:07:59 +0530

**स्थळ:- येवला.**
**दिनांक:- १२.०६.२०२३.**

**(एम. एस. लिगाडे)**
**न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग,**
**येवला, जि. नाशिक.**

<u>**प्रमाणपत्र**</u>

मी असे प्रमाणित करतो की, या न्यायनिर्णय/आदेशामधील सर्व मजकुर मुळ न्यायनिर्णय/आदेशाप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नावः- | प्रशांत अर्जुन बारगल, निम्नश्रेणी लघुलेखक. |
| न्यायालयाचे नावः- | श्री. एम. एस. लिगाडे, न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, येवला, जि.नाशिक. |
| न्यायनिर्णय/आदेशाची तारीखः- | १२.०६.२०२३. |
| पिठासीन अधिकारी यांनी सही केलेली केलेली न्यायनिर्णय/आदेशाची तारीख. | १२.०६.२०२३. |
| न्यायनिर्णय/आदेश अपलोड केल्याची | १२.०६.२०२३. |